पुणे, दि. ०४/१०/२००९

**<u>प्रेस नोट</u>**

**पोलीस उप आयुक्त,वाहतूक शाखा, पुणे शहर यांचे कार्यालयीन जा. क्र.**
**पोउआ/वाहतूक/नियोजन/पुणे शहर/२००९ – १७०२/०९**

पुणे शहरातील वाहतूक सुरळीत व सुरक्षित चालण्याचे दृष्टीने खालीलप्रमाणे जंगली महाराज रस्ता व फग्युर्सन कॉलेज रस्ता एकेरी वाहतूकीचा करणेकरीता वाहतूकीवर निर्बंध घालणे बाबतचा प्रस्ताव पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पुणे शहर यांचे विचाराधीन आहे. त्याकरीता या कार्यालयाकडील जावक क्र. नियोजन – ११९३/२००९ दि. १९.०८.२००९ अन्वये तात्पुरता आदेश काढून सदर योजना दि. २१.०८.२००९ ते ४.०९.२००९ या मुदतीमध्ये प्रायोगीक स्तरावर राबविण्यास आली असून सदर योजनेकरीता जावक क्र. नियोजन – १२१४/२००९, दि. ५.९.२००९ अन्वये व जावक क्र. १२५७, दिनांक १९.०९.२००९ अन्वये आणखी १५ दिवसांची मूदत वाढ देण्यात आली आहे. सदर मुदतीमध्ये प्राप्त झालेल्या सूचना व हरकती यांचा विचार करुन प्रायोगिक स्तरावर राबविण्याकरीता सदर योजनेकरीता दि. ५.१०.२००९ रोजीपासून पुढील १५ दिवसांकरीता मुदत वाढ देण्यात येत आहे. तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा,साधु वासवानी रोड पुणे -१ यांचे कार्यालयात **<u>दिनांक – ०५/१०/२००९ ते दिनांक - १९/१०/२००९</u>** पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. सदरचा आदेश हा तात्पुरत्या स्वरूपाचा असून सदरच्या आदेशाबाबत नागरीकांच्या आलेल्या सूचनांचा विचार करून त्याअन्वये यापूर्वीचे सदरबाबतचे सर्व आदेश रद्द समजण्यात येतील व सदर निर्बंधातून अत्यावश्यक सेवेतील वाहने (फायर ब्रीगेड, ॲम्ब्युलन्स, पोलीस वाहने इ.) वगळून अंतीम आदेश काढण्यात येईल.

**डेक्कन वाहतूक विभाग व शिवाजी नगर वाहतूक विभागांतर्गत खालील नमूद रस्त्यावर एकेरी वाहतूक व्यवस्था करण्याबाबत -**

1. **जंगली महाराज रोडवर स.गो.बर्वे चौक ते गरवारे पुलापर्यंतचा रस्ता स्वतंत्र बस लेनच्या अंमलबजावणीकरीता एकेरी वाहतूकीचा करणेबाबत.**
2. **फग्युर्सन कॉलेज रोडवर गुडलक चौक ते ज्ञानेश्वर पादूका चौक चौकपर्यंतचा रस्ता स्वतंत्र बस लेनच्या अंमलबजावणीकरीता एकेरी वाहतूकीचा करणेबाबत.**
3. **ज्ञानेश्वर पादूका चौक ते वीर चौक हा रस्ता एकेरी वाहतूकीचा करणेबाबत.**
4. **जंगली महाराज रोडवर स.गो.बर्वे चौकातून येणारे वाहतूकीकरीता मॉर्डन कॉलेज रोडकडे जाण्याकरीता उजवीकडे वळण्यास बंदी.**
5. **फग्युर्सन कॉलेज रोडवरील तुकाराम पादुका चौकातून घोले रोडवर उजवीकडे वळण्यास बंदी.**
6. **या व्यतिरीक्त जंगली महाराज रोड व फग्युर्सन कॉलेज रस्त्यांना जोडणारे सर्व रस्ते पुर्वीचे वाहतूक व्यवस्थेप्रमाणे राहतील.**

(मनोज पाटील)
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा,पुणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,

नविन मध्यवर्ती इमारत,पुणे – १

प्रतः- १) पोलीस  निरीक्षक प्रेस रूम पोलीस आयुक्त कार्यालय पुणे

२/-सदर प्रेस नोटच्या प्रति पत्रकारांना देवूनसदरची बातमी वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विंनती करावी.

२) पोलीस निरीक्षक, **डेक्कन वाहतूक विभाग**,  पुणे शहर

३) प्रभारी अधिकारी,  **शिवाजी नगर व डेक्कन** वाहतूक विभाग ,पुणे शहर

२/-सदर प्रेस नोटच्या प्रति संबंधित दुकानदार/प्रतिष्ठीत नागरिक व स्थानिक नागरिक यांना तात्काळ आदा करून ,त्याची स्वाक्षरी घेवून ती प्रत इकडील कार्यालयात रिपोर्टासह दोन दिवसात सादर करावी.

४) पोलीस शिपाई धुमाळ ब.न.४८६४ वाहतुक शाखा, पुणे शहर

२/-सदरची प्रेस नोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे. त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायाकिंत प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.